INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.828 (SJIF 2022)

# मध्ययुगीन लावणीचा आकृतिबंध

## (Diagram of Medieval Planting)

**डॉ. अंकुश काळे**
सहा. प्राध्यापक
मराठी विभाग,
महिला कला महाविद्यालय, बीड
E-mail: kaleankush121@gmail.com

**DOI No. 03.2021-11278686 DOI Link :: https://doi-ds.org/doilink/04.2022-59359929/IRJHIS2204020**

**प्रस्तावना :**

शाहिरांनी पोवाडा व लावणी हे रचना प्रकार हाताळले असले तरी ते आकृतिबंधाविषयी जागृत होते असे नाही. लावणीचा आकृतिबंध विविध घटकांतून पाहता येतो. सर्वसाधारणपणे "अभिजात वाङ्मय आणि लोकगीत यांच्यातील दुवा म्हणजे लावणी असे म्हटले जाते. यामध्ये एक विशेष जाणवते ते हे की, लोकगीताचा, लोकनाट्याचा प्रभाव लावणीवर होता. म्हणून लावणीचा उल्लेख गीतकाव्य असा केला असावा.

लावणीची समर्पक व्याख्या म. वा. धोंड यांनी केली. त्यांच्यामते, "सर्वसामान्यजनांच्या मनोरंजनाकरिता त्यांना रुचतील अशा लौकिक, पौराणिक व अध्यात्मिक विषयांवर रचलेली कडे वा ढोलकी यांच्या तालावर विशिष्ट ढंगाने म्हटलेली खटकेबाज व सफाईदार पद्यावर्तनी व भृंगावर्तनी जातिरचना म्हणजे लावणी."[१] या व्याखेच्या आधारे लावणीचा आकृतिबंध स्पष्ट करता येतो.

**लावणीचा आकृतिबंध :**

शाहिरांच्या पोवाडा व लावणी रचना एकमेकांना निकटच्या असलेल्या तरी या दोन्ही रचनांचा आकृतिबंध भिन्न-भिन्न आहे.यामध्ये लावणी रूपबंध स्फुट आहे, तर काही वेळा तो आत्मनिष्ठ बनतो. तर काही वेळा लावणी नाट्यरूप स्वरूपाची बनते. लावणी पोवाड्यापेक्षा किती तरी अधिक काव्यात्म आणि सफाईदार असते. लय व संगीतामुळे ती अधिकच जवळची वाटते. पोवाडा हा वीररसात्मक तर लावणी शृंगारप्रधान आहे. संतांनी अध्यात्मप्रधान मानले, तर लावणी कारणांनी अध्यात्माला लौकिक रूपात घेतले. त्यामुळे लावणीचे भौतिक जीवनाकडे लक्ष वेधले. शृंगारप्रधान आशयाने लावणीने काही वेगळे रूप घेतले. स्वतंत्र बाजातील मराठी कविता म्हणून लावणीची ओळख आहे. लावणीच्या रूपामध्ये गौळण आलेली आहे. परंतु ही गौळण संत-महंताप्रमाणे भक्तिरसाऐवजी शृंगारिक आहे. त्यामुळे लावणी मराठीचे खरे बोल सांगणारी रचना म्हणून तिच्याकडे पाहावे लागते. लावणीचा रचनाबंध वैशिष्ट्यपूर्ण असतो. आधी धृपद, पुढे चार चरणचे कडवे नंतर आवर्तन अशा पद्धतीची रचना केलेली असते.लावणीचे सादरीकरण धुमाळी, केरवा, दादरा या गायनासाठीच्या प्रमुख संगीताच्या तालावर होत असते. उदा.

बाई यशोदे बाळ तुझा तान्हा ।
तुला वाटे परी नष्ट मोठा कान्हा कान्हा ॥धृ॥

काल माझ्या घरी शिरून दूध प्याला॥
हाती धरिला परी जरा नाही भ्याला॥
मूल कशाचा भीती नाही याला॥
हाची झाला या गोकुळात राणा राणा॥१॥[२]

अशा लावण्यात खटका धरण्यासाठी द्रुपद असते आणि पुढे चार चरणांचेकडवे दिलेले आहे. म्हणजे धृपदाअगोदरचे पद आणि त्यानंतर धृपदाची योजना ठसकेबाजपणे केलेली असते.ती गेय असल्यामुळे विशिष्ट तालप्रिय रचनेच्या दृष्टीने केलेली असते.योग्य तालाकरिता आठ मात्रांच्या पद्मावर्तनी व सहा मात्रांच्या भृंगावर्तनी वृत्तात म्हणजेच तालमय जातीवृत्तात रचल्या आहेत. काही संस्कृत ज्ञान अवगत असणाऱ्या शाहिरांनी नवनवीन वृत्तयोजना केली आहे. तालमय जातिवृत्ते म्हणजे त्यांच्या गेयतेत तालाच्या जागा यति आणि खटके निर्धारित करतात. लावणीत सूर आणि लय साधण्यासाठी त्या पंचमात्रिक,षष्टमात्रिक आणि अष्टमात्रिक आवर्तनामध्ये म्हटल्या जातात. आवर्तनानंतर धृपदपुन्हा- पुन्हा घोळून त्यातून योग्य लय साधली जाते. लयीच्या अनुषंगाने लावणीत यमकानुप्रास अलंकाराचा वापर केलेला असतो. या छंदात अक्षरसंख्या नियमित असून ती अक्षरे आवाज चढवून अथवा खाली आणून उच्चारायची असतात. लावण्याच्या छंद रचनेविषयी म. वा. धोंड म्हणतात,"वैदिक ऋचा गायत्री, अनुष्टुभ, त्रिष्टुभ व जगती या चार छंदामध्ये लावण्या रचल्या आहेत."[३] लावणीचे छंदात लेखन करीत असताना पाचवी अक्षर लघू, सहावे अक्षर गुरु तसेच प्रथम व तृतीय चरणातील सातवे अक्षर गुरु दुसऱ्या व चौथ्या चरणातील सप्तमाक्षर लघु असे अनुष्टुभ छंदात असते. परंतु जाणकार लावणीकारांनी अशी रचना केली आहे. अन्यथा लावणी छंदाऐवजी रचनाप्रकार म्हणून विकसित झाली आहे.

**लावणीचे लेखन व सादरीकरण :**

**लेखन -**

लावणीच्या रचनेमध्ये वृत्त, विषय, संगीत आणि नाट्य हे घटक लक्षात घेऊन लेखन केलेले असते. समाजजीवनातील विषयांना अनुसरून लावणीकारांनी लौकिक विषय ठेवली आहेत. लावणीकारांनी परंपरेतील वृत्ताबरोबर जातीरचनेतील अनेक प्रयोग नवीन वृत्तात केली.एवढेच नव्हे तर लावण्यात अंतर्भूत असणारा खटका साधण्यासाठी ठराविक मात्रावर यमक जुळविला.'अंगी तारुण्याचा बहर, ज्वानी बहर मारितो लहर मदन तलवार' ही रचना स्वैर नव्हे की,वृत्ताच्याजाचकतेविरुद्ध बंड नव्हे; तर ती संगीतानुकूल म्हणता यावी यासाठी आहे.

विषयांमध्ये लौकिकता आणण्याचा उद्देश तत्कालीन परिस्थितीवर अवलंबून होता. अध्यात्म, कूटात्म, शृंगारिक आणि विविध विषयांवर लावण्या लिहिल्या आहेत. लावणीच्या लेखनात गेयतेच्या हेतूने नादमयता असणारी शब्दरचना निर्माण केली. ठराविक लयीत कडवे म्हणता यावीत यासाठी यमकाचा वापर केला आहे. यमक, अनुप्रासानी लावणीचे रूपसौंदर्य खुलविले आहे.

नावं तुझं साळू, चल आज खेळू
उभि दारिं नार नखऱ्यांची
चार तुझी मराठमोळ्याची ॥धृ॥[४]

या सगनभाऊच्या लावणी 'साळू-खेळू','नखऱ्याची-मराठमोळ्याची' या शब्दातील 'ळू' व 'ची' या व्यंजनाच्या पुनरूक्तीने जी लयबद्धता निर्माण झाली ती कलात्मक रूपसौंदर्य निर्माण करणारी आहे.लावणीच्या संहितेत येणारे शब्दमूळ, शब्दप्रतिमा, भाषिक छटा गडद करतात. यासाठी लावणीकारांनी लावणीच्या रचनेमध्ये द्विअर्थ असणारे शब्दचित्रे रंजकतेसाठी वापरली आहेत. 'बारीक कंबर, गुळगुळीत गाल, कसब्याचे गेंद, कमानदार भुवई व अन्य शब्दचित्रे रंजकता आणण्यासाठी उपयुक्त ठरतात. पोटऱ्या, दात, मुख, नाक, डोळे यांचे रेखीव वर्णन भाषिकतेत भर घालतात. गुणसौंदर्य रचनाकारांनी लावणीचे सादरीकरण लयीमध्ये व्हावे यासाठी विषयानुसार शब्द, प्रतिमा व भाषिक छटांचा वापर केला आहे. सौंदर्य निर्माण करण्यासाठी अलंकाराचा वापर केला आहे. काहीही वृत्ते वापरली व

रचना गेय केलेली आहे.

**सादरीकरण -**

लावणी श्रमगीते, उपासकांनी गायिलेल्यालोकगीतांतून विकास पावली. नाट्य, नृत्य, संगीत या अंगाने विकसित लावणी तमाशाच्या फडात भेटते. असे शाहिरांचे फड उत्तर पेशवाईत बहरास आले.मुलुखगिरीत गेलेले सरदार व सैनिक आणि संसारिक लोकांचा विरंगुळा म्हणून लावणी सादर होते. लावणीत विनोदांची बाजू सांभाळण्यासाठी स्त्री वेशधारी मुलगा होता. हा चौदा-पंधरा वर्षाचा कोवळा व देखणा पोऱ्या असायचा. त्याचे काम स्त्रीसुलभ हावभाव करणे,मुरके मारणे,नेत्रकटाक्ष फेकणे,डोलात लचकत चालणे इत्यादी अंगविक्षेप त्या पोऱ्याला करावे लागत.

उत्तर पेशवाईत तमाशाचे स्वरूप गण, गवळणी, लावण्या, भेदिक लावण्या,मुजऱ्यांच्या लावण्या असे होते. तमाशातील गण शाहिरांनी उपासकांच्या जागरण गोंधळ कार्यक्रमातून स्वीकारला. त्यानंतर कृष्णावरील गवळण सादर होते. यासाठी प्रत्येक शाहिरांनी गवळण लिहिली. तिची धाटणी मात्र लावणीसारखी आहे. सर्वसामान्य लोकांची भावनिक भूक भागविण्यासाठी शाहिरांनी शृंगारिक लावण्या सादर केल्या. शेवटी मुजऱ्याच्या लावण्या सादर करून प्रेक्षकांना वंदन करून आशीर्वाद मागण्यात येतो.

**लावणीसाठी वापरली जाणारी वाद्ये :**

लावणी सादरीकरणासाठी वाद्यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. यासाठी त्यांनी विविध वाद्ये उपयोगात आणली होती. संगीतात लय येण्यासाठी वाद्यांची साथ मिळाली तर त्यांच्या नांदामधून सुयोग्य भावाविष्कार होतो.लावणीकारांनी ही वाद्ये आणली कुठून हाही प्रश्न निर्माण होतो. लोकसंस्कृतीतीलउपासकांनी ज्या वाद्यांचा वापर केला. त्याच वाद्यांचा वापर शाहिराने केला. गोंधळी, वासुदेव, वाघ्या-मुरळी यांचे टाळ, मृदंग, चिपळ्या, ढोल, डफ, घुंगरू या वाद्यांचा स्थूलमानाने उल्लेख करता येतो. लावणीतील नजरेस भरणारे व लोकांना आपल्याकडे खेचून घेणारे वाद्य म्हणजे ढोलकी होय. ही ढोलकी लावणीकारांनी बरीच उशिरा स्वीकारली. शाहीर राम जोशी यांच्या लावण्यांत ढोलकीचा उल्लेख येत नाही. परंतु एकनाथाच्या अभंगात 'ढोल' चा उल्लेख येतो. ढोल आणि ढोलकी यामध्ये बराच फरक आहे. तंजावरील संग्रहित लावण्यांत वाद्यांचा उल्लेख येतो तो पुढीलप्रमाणे-

"The shair of the leader of the choir will lead the whole pertyin singing and the rest accompanying him in ful chorus. These lavani's are sung during socioreligious festivals such as holi and other quspiclous occasions of the Maharashtra espechally when Calebrating the birth of child in the house. The accompanying of the singer. The ekter or Thunthuna (Single stringed drone) and one of more Tambourines (Daph) and (cymblas)."

(त्रिस्थळी यात्रेच्या लावण्या Lxix मद्रास,१९५२)

या विधानांमध्ये तारया, तुंणतुणे, तंबोरा, डफ अशा वाद्यांचा उल्लेख येतो. परंतु ढोलकीचा उल्लेख येत नाही. शाहीर राम जोशी यांच्या लावण्यांत अनेक वाद्यांची नावे येतात. जसे की, खंजिरी, बासरी, डफ, सारंगी,सूरताल, पखवाज, करताल, मोरजंग, बीन, बासरी, झूमकन्या आदि वाद्य येतात. परंतु ढोलकी व कड्याचा उल्लेख सापडत नाही. तर शाहीर प्रभाकर एका लावणीत म्हणतात की,

"टाळविणे,मीरजंग,बीन मृदंग।
गर्जती कवी जंग।"

ताल वाद्य म्हणून उमापती शंकराचे डमरू वाद्य वापरले. गोंधळी लोकांनी डमरूचा उपयोग केला. गोंधळात डमरूचे प्रगत स्वरूप संबळ दिसते.

लावणीकारांनी प्रारंभी मर्यादित जनसमूहासमोर लावणी म्हणण्यासाठी धिमडी, डमरूचा उपयोग केला. पण पुढे सजवा-जवाबांचे फंड आले. प्रेक्षक वर्ग वाढला. तेव्हा धिमडीबरोबर डफाचा उपयोग लावणीकार करू लागले.

पुढे डफाबरोबर कडे आले.फरक एवढाच की डफाला थाप मारुन वाजवले जाते.तर कडे वाजविताना काडी वापरतात. श्रोत्यांना आपलेसे करून घेण्यासाठी त्यांच्या डोक्यात आपली लय भिनविण्यासाठी कामीकड्यांचा उपयोग होतो. संगीत आस ताल देण्यासाठी या वाद्याचा उपयोग होतो; परंतु नुसत्या तालाने संगीताला पूर्णत्व येत नाही. त्याकरिता संगीतामध्ये तालाबरोबर योग्य सुरांची आवश्यकता असते. अध्यात्मिक विचारांना एकतारी सुराचे वातावरण पोषक ठरते. भेदिक लावण्या व भारुडे याच संगीताच्या सुरांमध्ये गायले जातात. एकतारी स्वरामध्ये सादरीकरण होत असताना वातावरण शांत, गांभीर्यपूर्वक असते. त्यामुळे अध्यात्म उठून दिसते. मात्र शृंगारिक लावण्या या एकतारी सुरात उठावदारपणे सादर होत नाहीत. यासाठी शृंगाराला उठाव येण्याकरिता तुणतूण्याचा वापर केला जातो त्यामुळे तुणतुणे म्हटले की, शांततेची जागा जाऊन अवखळपणाची जाणीव होते. ढोलकी आणि तूणतुणे आशयाला प्रभावित करण्यासाठी कमी-अधिक यशस्वी ठरली. गायकाच्या फिरकीला आणि नर्तिकीच्या तोड्याला तुणतुणे उत्तम साथ देऊ शकते.

लावणी सादरीकरणाच्या सुरुवातीस ढोलकी तुणतुणे व घुंगराच्या आवाजाने प्रभावित करते. मंजिरी श्रोत्यांना गती दाखविण्याचे मंजुळ काम करते.सध्या तमाशात बाजाची पेटी सादरीकरणात आली. तत्पूर्वी तंबोऱ्याचा उपयोग करत असत. कोणत्याही तालाकरिता वाद्यांची गरज असते. ती या वाद्यातून पुरी होते.

**लावणीची वैशिष्ट्ये :**

लावणीचा लोकरंजनाच्या हेतूने विचार करता आला तरी समाजप्रबोधनाच्या हेतूने ही लावणीच्या विशेषाचा विचार नक्कीच करता येईल. लावणी समाजातील घटना-प्रसंग, व्यक्ती यांच्याशी लावणी एकरूप झाली की,त्यांच्याविषयी लावणीतून आत्मीयता प्रकट होते.

लावणीचे काही ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१. लोकरंजनाच्या हेतूने लावणी निर्माण झाली आणि बहरली. मध्ययुगीन काळी सैनिक, सरदार आणि सामान्यजनांसाठी लावणीचे फड कार्यरत राहिले. त्या दृष्टीने लोकरंजनाचे मूल्य लावणीला लाभलेले आहे.
२. शाहिरांनी लावणीचे सादरीकरण आर्थिक लाभासाठी केले. त्यासाठी त्यांनी लौकिक, पौराणिक व आध्यात्मिक रचना रसिकांच्या अअभिरुचनुसार सादर केले आहेत.
३. लावणीचा रचनाबंध आधी द्रुपद, पुढे चार चरणाचे कडवे नंतर आवर्तन असे वैशिष्ट्यपूर्ण असते. तसेच लावणीच्या गायनासाठी धुमाळी, केरवा, दादरा यासारखे संगीताचे ताल असतात.
४. लावणी हा रचनाप्रकार नृत्याभिनयाद्वारे भावाविष्कार घडविणारा आहे; कारण लावणी केवळ गीतप्रकार अथवा नृत्यप्रकार नसून दोन्हीचाभावाविष्कार आहे.
५. कथात्मकता, नाट्यात्मकता व मराठमोळी ही लावणीचे विशेष आहेत; पौराणिक, अध्यात्मिक लावण्यांतून हे विशेष प्रकर्षाने जाणवतात.
६. लावणीकारांची फडांच्या माध्यमातून स्पर्धा होत. हे तिचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे; कारण त्याकाळी शाहिरांचे कलगी-तुरा गवळी-राऊळ व नागेशी-हरदेशी असे फड होते.
७. मराठी लावणीतून मराठी राज्य व संस्कृतीचे दर्शन घडते. तसेच लावणीतून भाषिक संस्कृतीविषयी आत्मीयता प्रकट होते.

**संदर्भ ग्रंथ :**

१. म. वा., मह्राठी लावणी, मौज प्रकाशन, गृह मुंबई, तिसरी आवृत्ती, फेब्रुवारी २००३, पृष्ठ क्रमांक-१८.
२. जाधव मनोहर,तौर पृथ्वीराज, मराठी शाहिरी कविता निवडक पोवाडे व लावण्या, चिन्मय पब्लिकेशन, औरंगाबाद, पहिली आवृत्ती, २००९, पृष्ठ क्रमांक- ११२.
३. म. वा., मह्राठी लावणी,उनि,पृष्ठ क्रमांक-२४७.
४. तत्रैव, पृष्ठ क्रमांक- १३३.